दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

## १०० एलईडी दिवे चोरीला

**पुणे :** बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयातील स्वामी विवेकानंद रस्त्यावर महापालिकेने बसविलेले १०० एलईडी दिवे चोरीला गेले आहेत. विशेष म्हणजे यामधील एका दिव्याची किंमत १५ हजार रुपये आहेत. त्यामुळे या दिव्याची एकूण किमत १५ लाख ७५ हजार असताना केवळ पोलिसांत तक्रार नोंदविताना केवळ २ लाख ६० हजारांचा माल चोरीला गेल्याचे नमूद का केले असा प्रश्न उपस्थित केला आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 गुरूवार, दि. २३ जुलै २०२६ वर्ष - १ अंक -२९५ पाने - ४ पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### शिंदे गटात गेलेल्या ६ खासदारांचे भवितव्य सर्वोच्च न्यायालयात! ठाकरे गटाच्या याचिकेवर सुनावणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । वृत्तसंस्था :

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातून फुटून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केलेल्या सहा खासदारांच्या विलिनीकरणाचा वाद आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. सर्वोच्च न्यायालयाने ठाकरे गटाने दाखल केलेली याचिका सुनावणीसाठी स्वीकारली असून, या प्रकरणात लोकसभा अध्यक्ष आणि संबंधित खासदारांना नोटीस बजावली आहे. मात्र, या विलिनीकरणाला तातडीने स्थगिती देण्यास न्यायालयाने नकार दिल्याने ठाकरे गटाला अंशतः दिलासा आणि अंशतः धक्का बसला आहे.

काही दिवसांपूर्वी ठाकरे गटातील सहा खासदारांनी बंडखोरी करून शिंदे गटात प्रवेश केला होता. त्यानंतर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी या विलिनीकरणाला मान्यता दिली. या निर्णयामुळे शिंदे गटाची लोकसभेतील ताकद १३ खासदारांवर पोहोचली, तर ठाकरे गटाकडे केवळ ३ खासदार उरले. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात आणि संसदीय समीकरणात मोठा बदल झाला.

या निर्णयाला आव्हान देताना ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद केला की, सतत होणाऱ्या पक्षांतरामुळे राजकीय पक्षांची रचना कमकुवत होत आहे आणि संविधानातील दहाव्या अनुसूचीतील पक्षांतरविरोधी कायद्याचा उद्देशच निष्प्रभ होत आहे. जर अशा प्रकारच्या विलिनीकरणांना सहज मान्यता मिळत राहिली, तर लोकप्रतिनिधींना पक्ष बदलण्यापासून रोखण्यासाठी तयार करण्यात आलेल्या घटनात्मक संरक्षणालाच अर्थ उरणार नाही, असा त्यांचा दावा होता.

# विद्यार्थ्यांना न्याय कुठे? संसद मौन, सर्वोच्च न्यायालयालाही ‘वेळ नाही’; लोकशाहीत तरुणांनी दाद मागायची तरी कुणाकडे?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

दिल्ली । वृत्तविश्लेषण

राष्ट्रीय परीक्षा व्यवस्थेतील कथित अनियमितता, पारदर्शकतेचा अभाव आणि आवश्यक सुधारणांच्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरलेल्या विद्यार्थ्यांना सर्वोच्च न्यायालयाकडूनही तातडीचा दिलासा मिळालेला नाही. आंदोलनादरम्यान झालेल्या कथित पोलिस कारवाईची तातडीने दखल घेण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. आमच्याकडे व्हिडिओ पाहण्यासाठी वेळ नाही, असे स्पष्ट शब्दांत सांगत भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी तातडीच्या सुनावणीस नकार दिला.

न्यायालयाने विद्यार्थ्यांच्या मागण्या योग्य की अयोग्य, यावर कोणतीही टिप्पणी केलेली नाही. मात्र, कथित पोलिस कारवाईवर तातडीने सुनावणी नाकारल्याने या प्रकरणावरील सार्वजनिक चर्चेला नवे वळण मिळाले आहे.

सुनावणीदरम्यान वकिलांनी आंदोलनातील पोलिस कारवाईचे व्हिडिओ उपलब्ध असल्याचे सांगत सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून (सुओ मोटू) दखल घ्यावी, अशी विनंती केली. मात्र, सरन्यायाधीशांनी



न्यायालयाचा वेळ वाया घालवू नका, असे सांगत ही मागणी स्वीकारण्यास नकार दिला. आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांच्या मते, त्यांची लढाई केवळ एका परीक्षेपुरती मर्यादित नाही. राष्ट्रीय परीक्षा संस्थेमध्ये सुधारणा, परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि भविष्यात लाखो विद्यार्थ्यांच्या करिअरवर परिणाम करणाऱ्या अनियमितता टाळण्यासाठी ठोस धोरण आखावे, ही त्यांची प्रमुख मागणी आहे. या घडामोडींमुळे एक व्यापक प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आंदोलनकर्त्यांचा आरोप आहे की, त्यांच्या मागण्यांकडे कार्यपालिकेने अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले नाही, विधिमंडळातही या विषयावर पुरेशी चर्चा झालेली नाही आणि आता न्यायालयानेही तातडीची दखल घेण्यास नकार दिला आहे. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेत आपल्या प्रश्नांसाठी तरुणांनी दाद मागायची तरी कुणाकडे, असा प्रश्न आंदोलनकर्ते उपस्थित करत आहेत. भारतीय राज्यघटना शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार मान्य करते. अशा परिस्थितीत आंदोलन, त्यावरील कथित पोलिस कारवाई आणि त्यानंतर न्यायालयीन हस्तक्षेपाबाबत निर्माण झालेली परिस्थिती ही केवळ कायदेशीर नव्हे, तर लोकशाहीतील उत्तरदायित्वाचीही कसोटी ठरत आहे. सर्वोच्च न्यायालयाने या टप्प्यावर केवळ तातडीच्या सुनावणीस नकार दिला असून, प्रकरणाच्या गुणदोषांवर कोणतेही मत व्यक्त केलेले नाही. मात्र, या निर्णयामुळे परीक्षा व्यवस्थेतील सुधारणाचा प्रश्न, विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला मिळणारा संस्थात्मक प्रतिसाद आणि लोकशाहीतील उत्तरदायित्व यावरील चर्चा आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

## राहुल गांधींचा मोदी सरकारवर हल्लाबोल; ‘विद्यार्थ्यांची माफी मागा’ची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी

देशभरातील परीक्षा पेपरफुटीच्या घटनांवरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर तीव्र टीका करत, गेल्या दहा वर्षांत १५२ हून अधिक पेपरफुटी झाल्या, मात्र एकाही दोषीला शिक्षा झालेली नाही, असा आरोप केला. या कथित पेपरफुटींमुळे सुमारे ७.५ कोटी विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबांच्या भविष्यावर परिणाम झाला, असा दावा त्यांनी पत्रकार परिषदेत केला.

राहुल गांधी यांनी आरोप केला की, लाखो विद्यार्थी वर्षानुवर्षे कठोर परिश्रम करून स्पर्धा परीक्षांची तयारी करतात, तर दुसरीकडे पैशांच्या जोरावर परीक्षा प्रक्रियेत गैरव्यवहार करणाऱ्यांना संधी मिळते. त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावर निशाणा साधत त्यांना अपयशी शिक्षणमंत्री संबोधले आणि त्यांच्या तात्काळ राजीनाम्याची मागणी केली.

पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी केंद्र सरकारसमोर तीन प्रमुख मागण्या




मांडल्या. पहिली, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा. दुसरी, विद्यार्थी आंदोलनादरम्यान कथित कठोर पोलिस कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर चौकशी करून कारवाई करावी. तिसरी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेपरफुटीमुळे त्रस्त विद्यार्थ्यांची सार्वजनिक माफी मागावी. विद्यार्थी दहशतवादी नाहीत. त्यांच्या आवाजाला दडपण्याऐवजी सरकारने त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे, असेही राहुल गांधी म्हणाले. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर पेलेट गनचा वापर झाल्याचाही आरोप त्यांनी केला. या आरोपांवर सरकारकडून अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

शिक्षणाच्या वाढत्या खर्चावरही राहुल गांधी यांनी प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या मते, केंद्र सरकारचे वार्षिक शिक्षण बजेट सुमारे १.४ लाख कोटी असून, भारतीय कुटुंबे केवळ छएएढ परीक्षेच्या तयारीसाठी सुमारे १.३२ लाख कोटी खर्च करतात. त्यामुळे उच्च शिक्षण आणि स्पर्धा परीक्षा मध्यमवर्गीय व गरीब कुटुंबांसाठी अधिकाधिक महाग होत असल्याचा दावा त्यांनी केला. रोजगाराच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी उत्पादन क्षेत्रातील मंदी, लघुउद्योगांवरील संकट आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) मुळे नोकऱ्यांवर वाढणारा दबाव याचाही उल्लेख केला.

दरम्यान, विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनीही पाठिंबा जाहीर केला आहे. गुरुवारी अहिल्यानगर येथील गांधी स्मारकात ते दोन तासांचे मौन आंदोलन करणार असून, विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढावा आणि लोकशाहीत संवादाला प्राधान्य द्यावे, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

## मोदी–पवार भेटीने महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ! सत्तेच्या नव्या समीकरणांची चाहूल की केवळ शिष्टाचार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी बुधवारी संसद भवनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्यानंतर महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे. या भेटीमुळे शरद पवारांचा गट राष्ट्रीय लोकशाही आघाडी (छ्रअ) सोबत जाणार का, या प्रश्नावर पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात तर्क–वितर्क सुरू झाले आहेत.

संसद भवनातील पंतप्रधानांच्या दालनात झालेल्या या भेटीत पंतप्रधान मोदींनी शरद पवार यांचे हस्तांदोलन करून स्वागत केले. दोन्ही नेत्यांमध्ये काही काळ सविस्तर चर्चा झाल्याचे सांगितले जात असले, तरी चर्चेचा अधिकृत तपशील अद्याप समोर आलेला नाही. भेटीनंतर दोन्ही नेत्यांचे हसतमुख छायाचित्रे समोर आल्याने राजकीय चर्चांना अधिकच वेग आला.

या भेटीचे महत्त्व यासाठीही वाढले आहे की, याच आठवड्यात शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांनी जंतर–मंतर येथे जाऊन छएएढ पेपरफुटीविरोधातील आंदोलनाला पाठिंबा दिला होता. त्यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांचा विचार करण्याचे आवाहन करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीला पाठिंबा दर्शविला होता. त्यामुळे केंद्र सरकारवर टीका करणाऱ्या भूमिकेनंतर लगेचच झालेली मोदी–पवार भेट अनेक राजकीय प्रश्न निर्माण करत आहे. दरम्यान, काही दिवसांपासून अशी चर्चा आहे की, राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट पुन्हा एकत्र आल्यासच केंद्रातील सत्तेत सहभागी होण्याचा पर्याय खुला होऊ शकतो. अशा शक्यतांबाबत विविध राजकीय चर्चा सुरू असल्या तरी त्यासंदर्भात कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही. अजित पवार गटातील काही नेत्यांनी अशा चर्चांबाबत सावध भूमिका घेतल्याचेही वृत्त आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, संसदेच्या पावसाळी अधिवेशनात येऊ घातलेल्या काही महत्त्वाच्या विधेयकांवर राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका निर्णायक ठरू शकते. विशेषतः मतदारसंघ पुनर्रचना (शश्रळाळींरींळेप) संदर्भातील संभाव्य विधेयकावर पक्षाची भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र, सध्या राष्ट्रवादी काँग्रेसने या संदर्भात कोणतीही अधिकृत भूमिका जाहीर केलेली नाही.

यापूर्वीही राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीनंतर अशाच प्रकारच्या चर्चांना उधाण आले होते. मात्र, खासदार सुप्रिया सुळे यांनी अलीकडेच स्पष्ट केले होते की, छ्रअ मध्ये सामील होण्याबाबत पक्षाला कोणताही प्रस्ताव आलेला नाही आणि विविध नेत्यांमधील भेटी या प्रशासकीय किंवा संसदीय कामकाजाचा भाग असू शकतात,

## विद्यार्थ्यांवरील पोलिस कारवाईच्या निषेधार्थ वंचितची महाराष्ट्र बंदची हाक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई । प्रतिनिधी

दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या पोलिस कारवाईचे पडसाद आता महाराष्ट्रात उमटू लागले असून, वंचित बहुजन आघाडीने गुरुवार, २३ जुलै रोजी महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीमार आणि पोलिस कारवाईचा निषेध करण्यासाठी हा बंद पुकारण्यात आल्याचे पक्षाने जाहीर केले आहे.

वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून या बंदची घोषणा केली. त्यांनी आरोप केला की, न्यायाची मागणी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अश्रुधुराच्या नळकांड्या, पाण्याचे फवारे आणि कठोर पोलिस बळाचा वापर करण्यात आला. या घटनेतून केंद्र सरकारचा हुकूमशाही आणि फॅसिस्ट चेहरा पुन्हा एकदा समोर आला आहे, असा आरोप त्यांनी केला. सुजात आंबेडकर यांनी आपल्या आवाहनात म्हटले आहे की, महाराष्ट्र बंद ही केवळ एका राजकीय पक्षाची भूमिका नसून विद्यार्थ्यांच्या न्यायाच्या लढ्याला पाठिंबा देण्याचा प्रयत्न आहे. त्यांनी सर्व समविचारी राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, विद्यार्थी संघटना, पालक आणि नागरिकांनी या बंदमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे. त्यांच्या मते, ही लढाई केवळ पेपरफुटी किंवा पोलिस कारवाईविरोधात नसून देशातील शिक्षण व्यवस्था, लोकशाही आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित आहे. दरम्यान, दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनानंतर देशभरात शिक्षण व्यवस्था, परीक्षा प्रक्रियेतील कथित अनियमितता आणि आंदोलन हाताळण्याच्या सरकारी भूमिकेवरून राजकीय वातावरण तापले आहे. विविध विरोधी पक्षांनीही विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठिंबा देत केंद्र सरकारवर टीका केली आहे, तर सरकारकडून कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ती पावले उचलल्याचे सांगितले जात आहे.

## जिल्हा न्यायाधीशांचे निवृत्ती वय वाढणार? सर्वोच्च न्यायालयाचे राज्यांना निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी

देशातील जिल्हा न्यायाधीशांच्या निवृत्तीच्या वयाबाबत सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना जिल्हा न्यायाधीशांचे निवृत्ती वय ६१ वर्षांपर्यंत वाढविण्याचा विचार करण्याचे निर्देश दिले आहेत. यासाठी संबंधित राज्य सरकारांनी आपल्या उच्च न्यायालयांशी सल्लामसलत करून निर्णय घ्यावा, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाला बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहाना यांच्या खंडपीठासमोर ऑल इंडिया जजेस असोसिएशन प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. या प्रकरणात देशभरातील जिल्हा न्यायाधीशांचे निवृत्ती वय ६२ वर्षे करण्याची मागणी विचाराधीन आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, संपूर्ण देशात एकसमान निवृत्ती वय असावे का, याबाबतचा अंतिम निर्णय लवकरच घेतला जाईल.

अंतरिम स्वरूपात न्यायालयाने म्हटले आहे की, ज्या राज्य सरकार आणि संबंधित उच्च न्यायालयाची सहमती असेल, त्या राज्यांतील जिल्हा न्यायाधीशांना ६० ऐवजी ६१ वर्षांपर्यंत सेवा सुरू ठेवण्याची परवानगी दिली जाऊ शकते. मात्र, ही वाढ संबंधित राज्य आणि उच्च न्यायालयाच्या संयुक्त निर्णयावर अवलंबून असेल. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केले की, जर एखाद्या राज्याने आणि उच्च न्यायालयाने निवृत्ती वय वाढविण्याचा निर्णय घेतला, तर तो १ एप्रिल २०२६ पासून लागू करता येईल. यासाठी सर्व राज्ये आणि उच्च न्यायालयांना दोन आठवड्यांत आपली भूमिका प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत प्रश्न उपस्थित केला की, उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे निवृत्ती वय ६२ वर्षे असू शकते, तर जिल्हा न्यायाधीशांसाठी तेच वय ठेवण्यात अडचण काय आहे? या निरीक्षणामुळे सर्वोच्च न्यायालय या विषयाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहत असल्याचे संकेत मिळत आहेत.

दरम्यान, मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने आपल्या पूर्ण न्यायपीठाच्या बैठकीत जिल्हा न्यायाधीशांचे निवृत्ती वय ६२ वर्षे करण्याचा ठराव मंजूर केल्याची माहिती न्यायालयात देण्यात आली. तेलंगणामध्येही अशाच प्रकारचा निर्णय झाल्याचे सांगण्यात आले. मात्र, पंजाब आणि हरियाणासारख्या काही राज्यांनी या प्रस्तावाला विरोध दर्शवत, त्यांच्या राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वय ६० वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

या प्रकरणाचा परिणाम देशातील न्यायव्यवस्थेवर दूरगामी ठरू शकतो. न्यायाधीशांचा अनुभव अधिक काळ न्यायव्यवस्थेला उपलब्ध राहील, प्रलंबित खटल्यांचा ताण कमी करण्यास मदत होईल, असा एक मतप्रवाह आहे. तर दुसरीकडे, निवृत्ती वय वाढल्यास नव्या न्यायाधीशांच्या नियुक्त्यांवर आणि पदोन्नतीच्या संधींवर परिणाम होऊ शकतो, अशीही चिंता व्यक्त केली जात आहे.

## कर्करोगग्रस्त बालकांसाठी मुख्यमंत्री निधीचा नवा उपक्रम; २०० मुलांपुरतीच मदत, लाखो गरजूंना दिलासा की प्रतीकात्मक घोषणा?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई । वृत्तविश्लेषण

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात झालेल्या त्रिपक्षीय करारातून राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल २०० कर्करोगग्रस्त बालरुग्णांच्या निदानासाठी स्वतंत्र आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याची घोषणा करण्यात आली आहे. शासनाच्या म्हणण्यानुसार हा राज्यातील पहिलाच असा उपक्रम असून महागड्या निदान चाचण्यांचा खर्च उचलून उपचाराला होणारा विलंब कमी करणे हा त्यामागील उद्देश आहे.

पहिल्या नजरेत हा निर्णय स्वागतार्ह वाटतो. कारण अनेक कुटुंबे उपचार सुरू करण्यापूर्वीच निदानाच्या खर्चामुळे अडचणीत सापडतात. बायोप्सी, जनुकीय चाचण्या, पीईटी-सीटी, इम्युनोहिस्टोकेमिस्ट्रीसारख्या तपासण्यांचा खर्च हजारांपासून लाखांपर्यंत जाऊ शकतो. अशा वेळी आर्थिक मदत मिळाल्यास उपचार लवकर सुरू होण्याची शक्यता वाढते.

मात्र या योजनेचा दुसरा पैलूही तितकाच महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यात दरवर्षी हजारो बालकांमध्ये कर्करोगाचे नवीन रुग्ण आढळतात. अशा परिस्थितीत केवळ २०० लाभार्थ्यांपर्यंत मर्यादित असलेली योजना प्रत्यक्षात किती व्यापक परिणाम करू शकेल, हा प्रश्न उपस्थित होतो.

शासनाने दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या दोन महिन्यांत ५९ बालरुग्णांना सुमारे ५० लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे. यावरून उपक्रम प्रत्यक्षात सुरू झाल्याचे स्पष्ट होते. मात्र उर्वरित पात्र रुग्णांची निवड कशी होणार, कोणत्या निकषांवर प्राधान्य दिले जाणार, जिल्हानिहाय वाटप कसे असेल आणि २०० लाभार्थ्यांनंतर योजना वाढवली जाणार का, याबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध नाही.

योजनेची आणखी एक मर्यादा म्हणजे निदानासाठीचे सहाय्य मुख्यतः टाटा मेमोरियल सेंटरशी जोडलेले आहे. मुंबईपासून शेकडो किलोमीटर दूर असलेल्या विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र किंवा कोकणातील गरीब कुटुंबांसाठी प्रवास, निवास, रोजंदारीचे नुकसान आणि इतर खर्च हे अजूनही मोठे आव्हान राहणार आहे. निदानाचा खर्च शासन उचलत असले, तरी उपचारासाठी रुग्णालयापर्यंत पोहोचण्याचा खर्च अनेक कुटुंबांना परवडत नाही.

आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे की कर्करोगावर मात करण्यासाठी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे वेळेत निदान. निदान उशिरा झाल्यास उपचार अधिक गुंतागुंतीचे, खर्चिक आणि कमी परिणामकारक ठरू शकतात. त्यामुळे निदानासाठी आर्थिक सहाय्य देण्यामागील संकल्पना योग्य असली, तरी तिची व्याप्ती वाढविणे तितकेच आवश्यक आहे.

योजनेच्या दीर्घकालीन यशासाठी काही मूलभूत प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील. ही योजना केवळ कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (उडठ) निधीवर आधारित राहणार आहे की शासनाकडून नियमित अर्थसंकल्पीय तरतूद केली जाणार? टाटा मेमोरियलपुरती मर्यादित न ठेवता राज्यातील इतर प्रादेशिक कर्करोग केंद्रांनाही या उपक्रमाशी जोडले जाणार का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, निदानानंतरच्या उपचारांचा संपूर्ण आर्थिक भार उचलण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारली जाणार का?

वास्तव हे आहे की गरीब कुटुंबासाठी सर्वात कठीण टप्पा केवळ निदान नसतो; त्यानंतर सुरू होणारे महिनेभर किंवा वर्षभर चालणारे उपचार, औषधे, प्रवास आणि पुनर्वसन यांचा खर्च अधिक मोठा असतो. त्यामुळे निदानासाठी मदत हा नक्कीच सकारात्मक प्रारंभ आहे, पण तो संपूर्ण उपाय नाही.

एकूणच, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीअंतर्गत सुरू झालेला हा उपक्रम योग्य दिशेने टाकलेले पाऊल मानता येईल. परंतु महाराष्ट्रातील सर्व गरजू बालकांना वेळेत उपचार मिळावेत, असे खरोखरच उद्दिष्ट असेल, तर २०० लाभार्थ्यांची मर्यादा वाढवणे, जिल्हास्तरावर सुविधा उपलब्ध करणे आणि निदानापासून उपचारापर्यंतची अखंड आर्थिक साखळी उभी करणे आवश्यक ठरेल. अन्यथा हा उपक्रम काही कुटुंबांसाठी जीवनदायी ठरेल; परंतु हजारो गरजू बालरुग्णांसाठी तो केवळ आश्वासनापुरताच मर्यादित राहण्याची भीती नाकारता येत नाही.

## संपादकीय

### लाठीचा कायदा की कायद्याचे राज्य?

भारतीय लोकशाहीची खरी ताकद निवडणुकांमध्ये नाही, तर नागरिकांना मतभिन्नता व्यक्त करण्याचे आणि शांततापूर्ण आंदोलन करण्याचे असलेल्या अधिकारात आहे. स्वातंत्र्यलढ्यापासून ते आजपर्यंत आंदोलने ही भारतीय लोकशाहीचा अविभाज्य भाग राहिली आहेत. परंतु गेल्या काही वर्षांत आंदोलनांना उत्तर म्हणून पोलिसांकडून होणारा लाठीचार्ज हा जणू नियमित प्रशासकीय उपाय बनत चालल्याचे चित्र दिसत आहे. हा प्रवाह लोकशाहीसाठी धोक्याचा इशारा आहे. 'लाठीचार्ज' हा शब्द भारतीय दंड संहिता (IPC), फौजदारी प्रक्रिया संहिता (CRPC), पुरावा अधिनियम किंवा पोलीस कायद्यात स्पष्टपणे परिभाषित केलेला नाही. तरीही प्रत्यक्षात तो पोलिसांच्या कारवाईतील सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या साधनांपैकी एक ठरला आहे. ब्रिटिश राजवटीत आंदोलने दडपण्यासाठी वापरली जाणारी ही पद्धत स्वतंत्र भारतात फक्त हिंसक जमाव नियंत्रणासाठी मर्यादित असायला हवी होती. मात्र आज अनेकदा शांततापूर्ण विद्यार्थी आंदोलने मोडून काढण्यासाठीही तिचा वापर होत असल्याचे दिसते.

**संविधानाने दिलेला आंदोलनाचा अधिकार**

भारतीय संविधानाच्या कलम १९(१)(अ) नुसार प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे. कलम १९(१)(ब) शांततेने आणि निःशस्त्रपणे एकत्र येण्याचा अधिकार देते, तर कलम १९(१)(ड) देशात मुक्तपणे फिरण्याचा अधिकार प्रदान करते. या तरतुदींमुळे नागरिकांना शांततापूर्ण निदर्शने, मोर्चे आणि आंदोलन करण्याचा मूलभूत अधिकार मिळतो. संविधान निर्मात्यांनी हा अधिकार केवळ नैतिक तत्त्व म्हणून नव्हे, तर न्यायालयीन संरक्षण असलेला मूलभूत अधिकार म्हणून मान्यता दिली. कारण भारताचे स्वातंत्र्यच अहिंसक आंदोलनांच्या बळावर मिळाले होते. अर्थातच हा अधिकार अमर्याद नाही. सार्वजनिक सुव्यवस्था, राष्ट्रीय सुरक्षा आणि देशाची अखंडता यासाठी सरकार काही वाजवी निर्बंध लावू शकते. मात्र हे निर्बंध वाजवी असले पाहिजेत; मनमानी नसावेत.

**पोलिसांचे अधिकारही मर्यादितच**

CRPC च्या कलम १२९ आणि १३० अंतर्गत पोलिसांना बेकायदेशीर जमाव पांगविण्याचे अधिकार आहेत. मात्र हे अधिकार वापरण्यापूर्वी काही मूलभूत अटी पूर्ण होणे आवश्यक आहे. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने करमसिंग विरुद्ध हरदयालसिंग (१९७९) प्रकरणात स्पष्ट केले की,

* प्रथम, जमाव बेकायदेशीर असला पाहिजे.
* दुसरे, कार्यकारी दंडाधिकाऱ्याने जमावाला पांगण्याचा स्पष्ट आदेश दिलेला असावा.
* तिसरे, आदेशानंतरही जमावाने नकार दिला पाहिजे.

या अटी पूर्ण झाल्याशिवाय बलप्रयोगाचा प्रश्नच उद्भवत नाही.

**किमान शक्तीचा वापर हा कायद्याचा मूलमंत्र**

CRPC च्या कलम १३० मध्ये स्पष्ट शब्दांत नमूद आहे की जमाव पांगविताना शक्य तितकी कमी शक्ती वापरली जावी आणि व्यक्ती किंवा मालमत्तेचे कमीतकमी नुकसान व्हावे.

संयुक्त राष्ट्रांच्या Basic Principles on the Use of Force and Firearms नुसारही अहिंसक जमावाविरुद्ध शक्यतो बलप्रयोग टाळावा आणि अपरिहार्य असल्यास केवळ आवश्यक तेवढाच वापरावा.

उत्तर प्रदेश पोलीस नियमावली तसेच ब्युरो ऑफ पोलिस रिसर्च अँड डेव्हलपमेंट (BPRD) च्या मॉडेल पोलीस मॅन्युअलमध्येही काही मूलभूत तत्त्वे स्पष्ट करण्यात आली आहेत

* प्रथम स्पष्ट इशारा द्यावा.
* समजावून सांगण्याचा प्रयत्न करावा.
* त्यानंतरच किमान आवश्यक बलाचा वापर करावा.
* जमाव पांगल्यानंतर तात्काळ कारवाई थांबवावी.
* शिक्षेसाठी किंवा सूडबुद्धीने बलप्रयोग करता कामा नये.

ही तत्त्वे केवळ प्रशासकीय मार्गदर्शक तत्त्वे नसून लोकशाहीतील पोलिसी जबाबदारीची आधारशिला आहेत.

**सर्वोच्च न्यायालयाचा स्पष्ट संदेश**

अनिता ठाकूर विरुद्ध जम्मू-काश्मीर राज्य (२०१६) या महत्त्वाच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दांत म्हटले की, शांततापूर्ण आंदोलनांवर पोलिसी शक्ती वापरण्याचे कोणतेही औचित्य नाही. जमाव हिंसक झाल्यास मर्यादित आणि आवश्यक तेवढाच बलप्रयोग केला जाऊ शकतो. मात्र परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतरही मारहाण सुरू ठेवणे हे मानवी हक्कांचे उल्लंघन असून कायद्याच्या राज्यालाच धक्का देणारे आहे.

**विद्यार्थी आंदोलने आणि वाढती दडपशाही**

गेल्या दशकात जेएनयू, बनारस हिंदू विद्यापीठ, जादवपूर विद्यापीठ, उस्मानिया विद्यापीठ, अलीगड मुस्लिम विद्यापीठ यांसारख्या अनेक संस्थांमध्ये विद्यार्थी आंदोलनांवर लाठीचार्ज झाल्याच्या घटना घडल्या. अलीगड मुस्लिम विद्यापीठातील घटनेत विद्यार्थी पोलिसांकडे गुन्हा दाखल करण्याची मागणी करत शांततेने मोर्चा काढत होते. अशा परिस्थितीत प्रथम इशारा देणे, समजावणे किंवा पर्यायी उपाय शोधणे अपेक्षित असताना थेट लाठीचार्ज करण्यात आल्याचा आरोप झाला. अनेक विद्यार्थ्यांना गंभीर दुखापती झाल्या. काही दृश्यांमध्ये विद्यार्थी पळून गेल्यानंतरही त्यांचा पाठलाग करून मारहाण केल्याचे दिसले. जर जमाव आधीच पांगला असेल तर पुढील बलप्रयोग हा कायदा अंमलबजावणी नसून दडपशाही ठरतो.

**उत्तर प्रदेशातील वाढते लाठीचार्ज**

राष्ट्रीय गुन्हे नोंदवही (NCRB) च्या आकडेवारीनुसार उत्तर प्रदेशात लाठीचार्जच्या घटनांचे प्रमाण देशातील सर्वाधिक राज्यांपैकी एक राहिले आहे. इतर मोठ्या राज्यांच्या तुलनेत इतक्या मोठ्या प्रमाणावर बलप्रयोग का आवश्यक ठरतो, हा गंभीर सार्वजनिक धोरणाचा प्रश्न आहे. याचे उत्तर केवळ कायद्यात नाही, तर पोलिसांच्या प्रशिक्षणात, उत्तरदायित्वात आणि प्रशासकीय संस्कृतीत शोधावे लागेल.

**लोकशाहीचे भवितव्य पोलिस सुधारांवर**

भारताने ब्रिटिशांकडून संसदीय लोकशाहीचा वारसा स्वीकारला; पण त्याचबरोबर आंदोलने दडपण्यासाठी वापरली जाणारी वसाहतवादी पोलिसी मानसिकताही वारशाने मिळाली. आजही अनेकदा आंदोलनांकडे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहिले जाते, लोकशाहीतील मतभिन्नतेचा भाग म्हणून नाही.

लोकशाहीत पोलिसांचे काम सरकारचे संरक्षण करणे नव्हे, तर कायद्याचे संरक्षण करणे आहे. आंदोलक नागरिक हे शत्रू नसतात; ते संविधानाने दिलेला अधिकार वापरत असतात. त्यामुळे प्रत्येक लाठीचार्जची कायदेशीर, न्यायालयीन आणि प्रशासकीय चौकशी होणे आवश्यक आहे. पोलिसांना मानवी हक्क, जमाव नियंत्रणाचे आधुनिक तंत्र, संवाद कौशल्य आणि प्रमाणबद्ध बलप्रयोग यांचे नियमित प्रशिक्षण दिले गेले पाहिजे.

**निष्कर्ष** : लोकशाहीची खरी परीक्षा सरकारविरोधी घोषणांवर कशी प्रतिक्रिया दिली जाते यात असते. नागरिकांचा आवाज दडपण्यासाठी लाठी वापरणे सोपे आहे; परंतु संवाद, संयम आणि संविधानिक मूल्यांवर आधारित शासन करणे हीच खरी लोकशाही आहे.

आज गरज आहे ती लाठीच्या भीतीची नाही, तर कायद्याच्या राज्याची. अन्यथा Rule of Law hiyhiy Rule of Police मध्ये परिवर्तित होण्याचा धोका नाकारता येणार नाही. भारताची लोकशाही मजबूत ठेवायची असेल, तर आंदोलकांवर नव्हे, तर अन्यायावर लाठी चालली पाहिजे.

# अनुसूचित जाती आरक्षणाच्या उपवर्गीकरणाविरोधात २४ जुलैला पिंपरी-चिंचवडमध्ये महामोर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

अनुसूचित जातींच्या घटनात्मक आरक्षणाचे प्रस्तावित उपवर्गीकरण तात्काळ रद्द करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समिती, पिंपरी-चिंचवड शहर यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ रोजी महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. ५९ अनुसूचित जातींच्या प्रतिनिधींच्या सहभागाने हा मोर्चा निगडी येथील भक्ती-शक्ती शिल्पापासून अप्पर तहसील कार्यालय, पिंपरी-चिंचवड येथे जाणार असून, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या नावे अप्पर तहसीलदार यांच्यामार्फत सविस्तर निवेदन सादर करण्यात येणार आहे.

संघर्ष समितीने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अनुसूचित जातींना मिळालेले आरक्षण हे कोणत्याही सरकारची कृपा नसून भारतीय संविधानाने प्रदान केलेला घटनात्मक हक्क आहे. शतकानुशतके अस्पृश्यता, सामाजिक बहिष्कार, आर्थिक शोषण तसेच शैक्षणिक आणि राजकीय वंचना सहन केलेल्या समाजाला सामाजिक न्याय, समान संधी आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा, या उद्देशाने भारतीय संविधानात आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे घटनात्मक आरक्षणाचे कोणत्याही प्रकारचे उपवर्गीकरण करणे हे सामाजिक न्यायाच्या मूलभूत तत्त्वांवर आघात करणारे पाऊल असल्याचा दावा समितीने केला आहे.

समितीच्या मते, राज्य शासनाने अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणासाठी सुरू केलेली प्रक्रिया समाजामध्ये तीव्र अस्वस्थता आणि नाराजी निर्माण करणारी आहे. अशा निर्णयामुळे अनुसूचित जाती समाजात भेद निर्माण होऊन सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता असल्याचे समितीने म्हटले आहे. शासनाने समाजात फूट पाडणारे निर्णय घेण्याऐवजी अनुसूचित जातींच्या विद्यमान घटनात्मक हक्कांचे संरक्षण करण्यावर भर द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात येणार आहे की, शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, विद्यापीठे आणि सार्वजनिक क्षेत्रातील हजारो आरक्षित पदे अद्याप रिक्त आहेत. अनेक ठिकाणी डी-रिझर्व्हेशन, रोस्टर प्रणालीतील त्रुटी, अनुशेष, अपुरी भरती तसेच शिक्षण व शिष्यवृत्तीतील अडचणी यांसारखे प्रश्न कायम आहेत. या मूलभूत समस्या प्रलंबित असताना उपवर्गीकरणाचा विषय पुढे आणणे हे सामाजिक न्यायाच्या तत्त्वांशी विसंगत असल्याचे समितीने नमूद केले आहे.

संघर्ष समितीने स्पष्ट केले की, अनुसूचित जाती समाजाचा संविधान आणि लोकशाही व्यवस्थेवर पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे सध्या घटनात्मक आणि लोकशाही मार्गाने शासनाकडे न्याय मागितला जात आहे. मात्र, शासनाने या मागणीची दखल न घेतल्यास आणि उपवर्गीकरणाचा प्रस्ताव मागे न घेतल्यास राज्यभर जनजागृती, निदर्शने, धरणे, मोर्चे आणि लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारले जाईल. २४ जुलै रोजीचा महामोर्चा हा त्याच आंदोलनाचा एक भाग असल्याचे समितीने स्पष्ट केले असून, त्यानंतर निर्माण होणाऱ्या परिस्थितीची जबाबदारी राज्य शासनाची राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

## अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवडमध्ये राजकीय चर्चांना उधाण; अपेक्षित उत्साह न दिसल्याची कार्यकर्त्यांची भावना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राज्यभर विविध ठिकाणी अभिवादन, वृक्षारोपण, रक्तदान आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. मात्र, पिंपरी-चिंचवड शहरात त्यांच्या जयंतीनिमित्त पक्षाच्या स्तरावर अपेक्षित उत्साह दिसून न आल्याने राजकीय वर्तुळात आणि कार्यकर्त्यांमध्ये चर्चांना उधाण आले आहे.

शहरातील काही नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आपल्या स्तरावर विविध सामाजिक उपक्रम राबवून स्व. अजितदादा पवार यांना अभिवादन केले. मात्र, शहरभर एकत्रित स्वरूपात मोठा कार्यक्रम, जनसंपर्क अभियान किंवा कार्यकर्त्यांना एकत्र आणणारा उपक्रम दिसून न आल्याची भावना अनेक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

स्व. अजितदादा पवार यांनी पिंपरी-चिंचवडच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली होती. प्रशासनातील निर्णयक्षमता, विकासकामांचा वेग आणि जनतेच्या प्रश्नांवर तत्पर प्रतिसाद देणारी त्यांची कार्यशैली ही त्यांची ओळख मानली जात होती. त्यामुळे त्यांच्या पहिल्या जयंतीनिमित्त पक्षाकडून शहरव्यापी कार्यक्रम होईल, अशी अपेक्षा अनेक कार्यकर्त्यांची होती.

दरम्यान, शहरातील विविध प्रश्नांच्या पार्श्वभूमीवरही कार्यकर्त्यांमध्ये चर्चा सुरू आहे. मोशी दुर्घटना, पावसामुळे निर्माण होणारी पूरस्थिती, विविध विकासकामांबाबत उपस्थित होणारे प्रश्न, महापालिकेची आर्थिक स्थिती आणि सार्वजनिक कामांच्या गुणवत्तेबाबत नागरिकांकडून सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अशा वेळी संघटना जनतेच्या प्रश्नांवर अधिक सक्रियपणे काम करताना दिसावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसकडे ३६ नगरसेवक आणि विरोधी पक्षाची भूमिका आहे. त्यामुळे सभागृहाबरोबरच रस्त्यावरही जनतेच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे लढणारे नेतृत्व दिसावे, अशी भावना पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये आहे. पक्षाने सेवा उपक्रम, जनसंपर्क मोहीम आणि संघटनात्मक कार्यक्रमांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याची गरज असल्याचे मतही व्यक्त होत आहे.

## यशवंतराव चव्हाण रुग्णालयाप्रमाणे जिजामाता रुग्णालयालाही भव्य नामनिर्देशक कमान उभारावी

## नागरिकांची महापालिकेकडे मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या धर्तीवर जिजामाता रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावरही भव्य, आकर्षक आणि दूरवरून सहज दिसेल अशी नामनिर्देशक कमान उभारण्यात यावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

सध्या जिजामाता रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर असलेला नावाचा फलक आकाराने लहान असल्याने प्रथमच उपचारासाठी येणारे रुग्ण, त्यांचे नातेवाईक तसेच आपत्कालीन सेवेसाठी येणाऱ्या नागरिकांना रुग्णालय शोधताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

पिंपरी, काळेवाडी, पिंपरी गाव, पिंपरी कॅम्प, भाटनगर, डिलक्स टॉकीज परिसर तसेच आजूबाजूच्या भागांतून दररोज शेकडो नागरिक उपचारासाठी जिजामाता रुग्णालयात येतात. मात्र, रुग्णालयाचा फलक दूरवरून स्पष्टपणे दिसत नसल्याने अनेकांना चौकशी करत रुग्णालय गाठावे लागते.

त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांचा मौल्यवान वेळ वाया जात असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाप्रमाणेच जिजामाता रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर आधुनिक, प्रकाशयुक्त आणि मोठ्या अक्षरांतील नामनिर्देशक कमान उभारण्यात आल्यास रुग्णालयाची ओळख अधिक ठळक होईल. तसेच रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना रुग्णालय शोधणे अधिक सुलभ होईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.

या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने नागरिकांच्या मागणीची दखल घेऊन जिजामाता रुग्णालयासाठी भव्य नामनिर्देशक कमान उभारण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी जोर धरत आहे. नागरिकांच्या सोयीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा ठरेल, असे मतही व्यक्त करण्यात येत आहे.

## मोशीवर कचऱ्याचा नवा भार नको: १६ एकरांचा प्रस्ताव रद्द करण्याची माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांची आयुक्तांकडे मागणीप्रस्ताव रद्द करण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे (झउचउ) माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांनी महापालिका आयुक्तांकडे लेखी निवेदन देऊन मोशी येथील नियोजित कचरा डेपोचा प्रस्ताव तातडीने रद्द करण्याची जोरदार मागणी केली आहे.१६ एकर जागेचा वाद: मोशी वेस्ट डेपो जवळील 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या शेजारी असणाऱ्या सुमारे १६ एकर जागेवर शहराचा दैनंदिन कचरा साठवण्याचा (कचरा डेपो) नवीन प्रस्ताव प्रशासनाच्या विचाराधीन आहे.

स्थानिक नागरिकांच्या आरोग्याला धोका: मोशी आणि परिसरात आधीच मोठ्या प्रमाणात कचरा साठवला जात असल्याने दुर्गंधी आणि प्रदूषणामुळे स्थानिक रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या नव्या प्रस्तावामुळे येथील नागरिकांवर आणखी अन्याय होईल, अशी भीती वाघेरे यांनी व्यक्त केली आहे.पर्यायी आणि वैज्ञानिक जागेचा शोध घ्या: शहराचा कचरा निवासी वस्तीपासून दूर, पर्यावरणपूरक आणि शास्त्रीय (Scientific) दृष्टिकोनातून योग्य अशा पर्यायी जागेवर साठवण्यात यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## मोशी कचरा डेपो दुर्घटना : मृतांच्या वारसांना आर्थिक मदत वितरणाला वेग; तिघांच्या खात्यात प्रत्येकी १० लाखांची मदत जमा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : मोशी येथील कचरा डेपोमध्ये ८ जुलै रोजी झालेल्या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या नागरिकांच्या कायदेशीर वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून वेगाने सुरू आहे. महापौर रवि लांडगे यांच्या निर्देशानुसार आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया तातडीने राबविण्यात येत असून, कागदपत्रांची पूर्तता झालेल्या लाभार्थ्यांच्या खात्यात मदतीची रक्कम थेट जमा करण्यात येत असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली. महापालिकेने मृत सन्नी माने, राहुल गायकवाड आणि वामन कसबे यांच्या कायदेशीर वारसांच्या खात्यात प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत जमा केली आहे. सन्नी माने यांच्या पत्नी मनीषा सन्नी माने यांच्या खात्यात ५ लाख रुपये, तर आई फौजिया अझीम माने यांच्या खात्यात ५ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. राहुल गायकवाड यांच्या पत्नी भाग्यश्री राहुल गायकवाड यांच्या खात्यात ५ लाख रुपये, तर आई सरस्वती गायकवाड आणि वडील अर्जुन गायकवाड यांच्या खात्यात प्रत्येकी २.५० लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. तसेच, वामन कसबे यांच्या पत्नी सुमन वामन कसबे यांच्या खात्यात संपूर्ण १० लाख रुपयांची मदत जमा करण्यात आली आहे.

## अजित पवार यांच्या जयंतीदिनी PCMC भवनात राजकीय खडाजंगी; वेळेवरून भाजप-राष्ट्रवादी आमनेसामने

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका मुख्यालयात दिवंगत ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमाच्या वेळेवरून सत्ताधारी भाजप आणि विरोधी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांमध्ये बुधवारी जोरदार वादावादी झाली. कार्यक्रमाला झालेल्या विलंबावरून दोन्ही पक्षांचे नेते पालिका भवनातच आमनेसामने आल्याने काही काळ वातावरण तणावपूर्ण बनले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी महापौर डॉ. वैशाली घोडेकर यांनी प्रशासन आणि सत्ताधारी भाजपवर गंभीर आरोप करत, महापुरुष व दिवंगत नेत्यांच्या जयंती-पुण्यतिथीचे कार्यक्रम सकाळी १० वाजता घेण्याची परंपरा असताना तब्बल दोन तास विलंब करण्यात आल्याचे सांगितले. हा विलंब हेतुपुरस्सर करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

शहराध्यक्ष योगेश बहल आणि फजल शेख यांनीही या भूमिकेला पाठिंबा देत, दुपारी १२ वाजेपर्यंत कार्यक्रम सुरू न होणे ही दिवंगत नेत्यांचा अवमान करणारी बाब असल्याची टीका केली. सत्ताधाऱ्यांनी राजकीय आकसातून हा प्रकार घडविल्याचा आरोपही त्यांनी केला.

दरम्यान, या आरोपांना उत्तर देताना सत्ताधारी भाजपचे नेते प्रशांत शितोले यांनी विलंबामागे कोणताही राजकीय हेतू नसल्याचे स्पष्ट केले. पालिका प्रशासनाची एक अत्यंत महत्त्वाची आणि तातडीची बैठक सुरू असल्याने कार्यक्रम पुढे ढकलावा लागल्याचे त्यांनी सांगितले. दिवंगत नेत्यांविषयी आमच्याही मनात तितकाच आदर असून, कोणाचाही अपमान करण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

याच मुद्द्यावरून डॉ. वैशाली घोडेकर आणि प्रशांत शितोले यांच्यात पालिका भवनातच जोरदार शाब्दिक चकमक झाली. दोन्ही बाजूंच्या कार्यकर्त्यांनीही आक्रमक भूमिका घेतल्याने काही काळ पालिका परिसरात राजकीय वातावरण तापले होते.

या घटनेमुळे पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात पुन्हा एकदा भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातील संघर्ष उघडपणे समोर आला असून, एका स्मरणदिनाच्या कार्यक्रमावरूनही राजकीय आरोप-प्रत्यारोपांना जोर चढल्याचे चित्र पाहायला मिळाले.



## मोशी कचरा डेपो दुर्घटना : नऊ कामगारांच्या मृत्यूप्रकरणी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

मोशी कचरा डेपो येथे ८ जुलै रोजी झालेल्या भीषण दुर्घटनेत नऊ सफाई कामगारांचा मृत्यू झाल्याप्रकरणी जबाबदार अधिकारी, संबंधित ठेकेदार आणि दोषींवर सदोष मनुष्यवधासह लागू कायद्यांतर्गत तात्काळ गुन्हा दाखल करावा, अशी संयुक्त मागणी विविध सामाजिक व राजकीय संघटनांनी पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, कचऱ्याची कथित नियमबाह्य साठवण, आवश्यक सुरक्षा उपाययोजनांचा अभाव आणि संबंधित यंत्रणांच्या निष्काळजीपणामुळे कचऱ्याचा मोठा ढीग कोसळून दुर्घटना घडली. या घटनेत नऊ निष्पाप कामगारांचा



मृत्यू झाला. त्यामुळे ही घटना केवळ अपघात नसून गंभीर निष्काळजीपणाचे परिणाम असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

संघटनांनी या प्रकरणात महापालिकेच्या पर्यावरण विभागातील अभियंते संजय कुलकर्णी आणि योगेश आल्हाट, तसेच बांधकाम परवाना विभाग, अतिक्रमण विभागातील संबंधित अधिकारी, कचरा डेपोचे ठेकेदार अँथनी लारा कंपनीचे जबाबदार अधिकारी आणि चौकशीत दोषी आढळणाऱ्या इतर संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

भविष्यात अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, सार्वजनिक यंत्रणांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण व्हावी आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्यांवर कायद्याचा धाक राहावा, यासाठी निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करण्यात यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

हे निवेदन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, मारुती भापकर, काँग्रेसचे शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे, शिवसेनेचे शहरप्रमुख चेतन पवार, मनसेचे शहरप्रमुख सचिन चिखले, आम आदमी पार्टीचे युवक अध्यक्ष विकी पासोटे, मराठा सेवा संघाचे कार्याध्यक्ष प्रकाश जाधव, संभाजी ब्रिगेडचे पुणे जिल्हाध्यक्ष प्रवीण कदम, संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष सतीश काळे तसेच छावा मराठा युवा महासंघाचे अध्यक्ष धनाजी येळकर पाटील यांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात आले आहे.

दरम्यान, या मागणीवर पोलीस प्रशासन किंवा संबंधित विभागाकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. प्रकरणाचा तपास आणि चौकशी अहवालानंतर पुढील कायदेशीर कारवाईबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

# लोणी–मंचर रस्त्यावर झाडाझुडपांचा विळखा; अपघाताचा धोका वाढला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील लोणी–मंचर मार्गावर जारकरवाडी येथील भोजनधरा परिसर तसेच लोले वस्ती नजीक रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात झाडे व झुडपे वाढल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यालगत वाढलेल्या झाडाझुडपांमुळे समोरून येणारी वाहने दिसत नसल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.

या मार्गावरून जारकरवाडीमार्गे अवसरी खुर्द, मंचर, घोडेगाव आणि नारायणगावकडे दररोज नागरिक, विद्यार्थी तसेच नोकरदार मोठ्या संख्येने प्रवास करतात. मात्र रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाढलेल्या झाडाझुडपांमुळे वाहनचालकांची दृश्यमानता कमी होत असून वाहतूक धोकादायक बनली आहे. याशिवाय रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडल्याने वाहनचालकांना अक्षरशः तारेवरची कसरत करत प्रवास करावा लागत आहे.

विशेष म्हणजे, रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात वाढलेल्या




लोणी–मंचर (ता. आंबेगाव) मार्गावरील जारकरवाडी येथील भोजनधरा परिसर व लोले वस्ती नजीक रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या झाडाझुडपांमुळे वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे.

निरगुडीच्या झुडपांमुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. रस्त्यांची देखभाल व दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने रस्त्यालगत वाढलेली झाडे व झुडपे हटवून रस्ता सुरक्षित करावा, अशी मागणी उपसरपंच सचिन टाव्हरे, मोहन दरेकर, उद्योजिका ज्योती गोरडे यांच्यासह स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांनी केली आहे.

## सारांश वृत्त

### भोंगवलीत ग्रामस्थांचा विरोध कायम; पोलिस बंदोबस्तात हाय व्होल्टेज प्रकल्पाचे काम सुरू



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भोर । प्रतिनिधी**

भोर तालुक्यातील भोंगवली गावात प्रस्तावित हाय व्होल्टेज वीज प्रकल्पाच्या कामाला ग्रामस्थांचा तीव्र विरोध कायम असतानाच पोलिस बंदोबस्तात काम सुरू करण्यात आल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांनी या प्रकल्पामुळे शेती, पर्यावरण आणि गावाच्या भवितव्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, स्थानिकांच्या विरोधाकडे दुर्लक्ष करून प्रशासनाच्या उपस्थितीत आणि पोलिस बंदोबस्तात काम सुरू करण्यात आले. त्यामुळे संतप्त ग्रामस्थांनी पुन्हा एकदा प्रकल्पाविरोधात आवाज उठवला असून, काम तातडीने थांबविण्याची मागणी केली आहे.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते गणेश निगडे यांनी, हा प्रकल्प गावाच्या भवितव्यासाठी धोकादायक ठरू शकतो. ग्रामस्थांच्या भावना आणि हरकती विचारात न घेता काम सुरू करणे योग्य नाही. प्रशासनाने संवाद साधून तोडगा काढावा, असे मत व्यक्त केले.

ग्रामस्थांनी सांगितले की, प्रकल्पाबाबत अनेक शंका अद्याप कायम असून, शेती, पर्यावरण आणि नागरिकांच्या सुरक्षिततेवर होणाऱ्या परिणामांचा सखोल अभ्यास करूनच पुढील निर्णय घ्यावा. प्रकल्पासंदर्भात स्थानिकांना विश्वासात न घेता काम सुरू केल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला.

दरम्यान, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी घटनास्थळी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या प्रकरणी प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

## दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जयंती वृक्षारोपण करून साजरी



निरगुडसर (ता. आंबेगाव) येथील पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक व दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालयात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी–धामणी । प्रतिनिधी**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. त्याच पार्श्वभूमीवर आंबेगाव तालुक्यातील निरगुडसर येथील पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक व दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य कांताराम टाव्हरे, पर्यवेक्षक संतोष वळसे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालक उपस्थित होते. उपस्थितांनी अजित पवार यांच्या सार्वजनिक जीवनातील योगदान, प्रशासनातील कार्यपद्धती आणि सर्वसामान्यांच्या विकासासाठी त्यांनी केलेल्या कामांचे स्मरण करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. दरम्यान, आंबेगाव तालुक्यातील विविध प्राथमिक, माध्यमिक शाळा तसेच सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांमध्येही दिवंगत अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांना अभिवादन करण्यात आले.

## यवतमध्ये एचएसआरपी कायद्याला 'खो'; पोलिसांच्याच गाड्यांवर नंबर प्लेट गायब, नागरिक संतप्त!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**यवत । विशेष प्रतिनिधी**

रस्ते अपघात, वाहन चोरी आणि गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने सर्व वाहनांसाठी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (क्ष्ठझ्) बंधनकारक केली आहे. मात्र, यवत परिसरात या नियमाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. परिसरातील अनेक वाहनांवर अद्याप एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यात आलेल्या नाहीत.

विशेष म्हणजे, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यवत पोलीस ठाण्यातील काही पोलिस वाहनांवरच नंबर प्लेट गायब किंवा अस्पष्ट असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, कायदा सर्वांसाठी समान आहे की फक्त सामान्य नागरिकांसाठी? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**कायद्याची अंमलबजावणी फक्त नागरिकांसाठीच?**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार एचएसआरपी नंबर प्लेट सक्तीची करण्यात आली आहे. या प्लेटवर हॉट-स्टॅम्प केलेले क्रोमियम होलोग्राम, १० अंकी युनिक लेझर कोड आणि इतर सुरक्षा वैशिष्ट्ये असतात. त्यामुळे चोरीच्या किंवा गुन्ह्यात वापरल्या जाणाऱ्या वाहनांचा मागोवा घेणे सोपे होते. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाईचीही तरतूद आहे.

मात्र, यवत पोलीस ठाण्याच्या आवारात आणि परिसरात उभ्या असलेल्या काही सरकारी व खासगी वाहनांवर नंबर प्लेटच नसल्याचे किंवा त्या पूर्णपणे झिजून अस्पष्ट झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांवर दंडात्मक कारवाई करणाऱ्या यंत्रणांनी स्वतः नियमांचे पालन केले आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**बेशिस्त पार्किंगने वाहतूक कोंडी गंभीर**

एचएसआरपीच्या प्रश्नाबरोबरच यवत पोलीस ठाण्याच्या परिसरात बेशिस्त पार्किंगची समस्याही गंभीर बनली आहे. पोलीस ठाण्याच्या आजूबाजूला आणि मुख्य रस्त्यावर वाहने अनियमितपणे उभी केली जात असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. पादचाऱ्यांना चालण्यासाठी जागा उरत नाही, तर एसटी बस, रुग्णवाहिका आणि इतर अत्यावश्यक सेवांच्या वाहनांनाही वाहतूक कोंडीचा फटका बसत आहे.

दररोज पोलीस ठाण्याच्या उंबरठ्यावरच वाहतूक कोंडी होत असतानाही संबंधित यंत्रणा त्याकडे दुर्लक्ष करत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

**नागरिकांची मागणी**

स्थानिक नागरिकांनी यवत पोलिसांनी प्रथम स्वतःच्या सर्व वाहनांवर नियमांनुसार एचएसआरपी नंबर प्लेट बसवून आदर्श निर्माण करावा, तसेच पोलीस ठाणे परिसरातील बेशिस्त पार्किंगवर विशेष मोहीम राबवून वाहतूक कोंडी कायमस्वरूपी दूर करावी, अशी मागणी केली आहे.

कायदा सर्वांसाठी समान असतो. त्यामुळे नियमांचे पालन करण्याची सुरुवात अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेकडूनच झाली, तरच नागरिकांमध्ये कायद्याविषयी विश्वास आणि शिस्त निर्माण होईल.

## स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त भीमाशंकर कारखान्यात वृक्षारोपण; एआय आधारित ऊस शेती मेळाव्याची घोषणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या वतीने महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त कारखाना परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर कारखाना परिसरात आंब्याच्या रोपांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे, संचालक मंडळ, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने कारखाना परिसरातील सुमारे १० हेक्टर क्षेत्रात आंबा लागवडीचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला असून, या उपक्रमामुळे परिसर अधिक हिरवागार होण्यासोबतच पर्यावरण संतुलन राखण्यासाठीही मोठे योगदान मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.





यावेळी बोलताना चेअरमन बाळासाहेब बेंडे यांनी वाढते प्रदूषण, तापमानातील वाढ आणि बदलते हवामान ही आजची गंभीर आव्हाने असल्याचे सांगितले. या समस्यांवर प्रभावी उपाय म्हणून वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रत्येक नागरिकाने लावलेले झाड जगविले, तरच पुढील पिढीला स्वच्छ, हरित आणि निरोगी पर्यावरण मिळू शकेल, असे ते म्हणाले.

यावेळी त्यांनी शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची घोषणाही केली. दि. २७ जुलै ते २ ऑगस्ट या कालावधीत भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या वतीने कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) तंत्रज्ञानावर आधारित ऊस शेती मार्गदर्शन मेळाव्यांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या मेळाव्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ऊस उत्पादन वाढविणे, उत्पादन खर्च कमी करणे, रोग व कीड व्यवस्थापन, सिंचन नियोजन तसेच स्मार्ट शेतीविषयी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. तालुक्यातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी या मेळाव्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त पर्यावरण संवर्धन आणि आधुनिक शेतीचा संदेश देणारा हा उपक्रम राबविल्याबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी वृक्षसंवर्धनाची सामूहिक शपथ घेतली.

## अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त शिरूरमध्ये अभिवादन; मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिरूर । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त शिरूर शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यानिमित्त पक्षाच्या शहर कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला, तसेच नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजित पाचर्णे यांनी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बोलताना त्यांनी अजितदादा पवार यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली राज्यात अनेक विकासकामे मार्गी लागली असून सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध लोककल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्यात आल्याचे सांगितले. त्यांच्या विकासाभिमुख कार्यशैलीचे स्मरण करून उपस्थितांनी त्यांना विनम्र अभिवादन केले.

कार्यक्रमास नगरपालिकेच्या सभापती स्वाती साठे, सभापती सुनील जाधव, एजाज बागवान, उपसभापती आयेशा सय्यद, माजी उपनगराध्यक्ष जाकीरखान पठाण, नगरसेविका संगीता मल्लाव, नगरसेवक अभिजित पाचर्णे, निलेश गाडेकर, राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या श्रुतिका झांबरे, शहराध्यक्ष शरद कालेवार, माजी सभापती संतोष शितोळे, रंजन झांबरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा नागरिकांनी लाभ घेतला. स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले.

## बोरी पारधीत ग्रामपंचायतीच्या टपरीतच अवैध मटका?; 'अभय कुणाचे?' असा नागरिकांचा सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दौंड । प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील बोरी पारधी येथे ग्रामपंचायतीच्या मालकीच्या टपरीत सर्रास अवैध मटका व्यवसाय सुरू असल्याचा आरोप समोर आला असून, या प्रकारामुळे परिसरात संतापाची लाट पसरली आहे. ग्रामपंचायतीच्या जागेवरच हा अवैध व्यवसाय सुरू असताना संबंधित यंत्रणा कारवाई का करत नाही, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित ठिकाणी दीर्घकाळापासून मटका व्यवसाय सुरू असून, त्याकडे पोलीस आणि संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे या अवैध व्यवसायाला नेमके कोणाचे अभय आहे? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

गावातील तरुणांमध्ये जुगाराचे वाढते व्यसन, आर्थिक नुकसान आणि सामाजिक परिणाम याबाबतही नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. ग्रामपंचायतीच्या मालमत्तेचा वापर अशा बेकायदेशीर कृत्यांसाठी होत असेल, तर संबंधितांवर कठोर कारवाई करून हा प्रकार तातडीने बंद करण्यात यावा, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी आणि अवैध मटका व्यवसायाला संरक्षण देणाऱ्यांचीही चौकशी करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

टीप: या वृत्तातील आरोप स्थानिकांकडून करण्यात आलेले आहेत. संबंधित प्रशासन किंवा पोलिसांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे त्यांचा प्रतिसाद मिळाल्यानंतर तोही प्रसिद्ध केला जाईल.

## दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जयंती मंचर पोलीस ठाण्यात अभिवादन करून साजरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी (दि. २२) मंचर पोलीस ठाण्यात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विनम्र अभिवादन केले. उपस्थितांनी त्यांच्या सार्वजनिक जीवनातील योगदानाचे स्मरण करत आदरांजली अर्पण केली.





कार्यक्रमात अजित पवार यांनी राज्याच्या विकासासाठी, प्रशासनातील कार्यक्षमता वाढविण्यासाठी तसेच ग्रामीण आणि शहरी भागातील विविध विकासकामांना दिलेल्या गतीचा उल्लेख करण्यात आला. लोकाभिमुख निर्णय, सर्वसामान्यांच्या प्रश्नांबाबतची संवेदनशीलता आणि विकासाभिमुख दृष्टीकोन याबाबत उपस्थितांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवून समाजसेवा, कर्तव्यनिष्ठा आणि लोकहिताची भावना जपण्याचा संकल्प व्यक्त केला. तसेच महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि पायाभूत विकासात त्यांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण करून त्यांच्या कार्याला उजाळा देण्यात आला.

राज्यभर दिवंगत अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, मंचर पोलीस ठाण्यातील हा अभिवादन कार्यक्रम शांत, शिस्तबद्ध आणि आदरपूर्ण वातावरणात पार पडला.

फोटो ओळ :

मंचर पोलीस ठाण्यात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अभिवादन केले.

## सारांश वृत्त

### दुरुस्तीच्या नावाखाली लाखोंचा खर्च? १८ लाखांच्या पुलासाठी ३७.४२ लाखांची वर्क ऑर्डर; सार्वजनिक बांधकाम विभागावर संशयाची सुई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

दौंड । प्रतिनिधी

दौंड तालुक्यातील वरवंड-कडेठाण-हटवळण (एमडीआर-९७) मार्गावरील चेन क्र. ६/१०० येथील लघुपुलाच्या दुरुस्ती व पुनर्वसनासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व विभाग), पुणे यांनी ३७ लाख ४२ हजार ४६७ रुपयांची वर्क ऑर्डर काढल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, संबंधित पुलाच्या मूळ बांधकामाचा खर्च सुमारे १८ लाख असल्याचे सांगितले जात असल्याने, केवळ दुरुस्तीसाठी मूळ खर्चाच्या दुप्पट रक्कम मंजूर केल्याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. उपलब्ध कार्यादेशानुसार, ८ जून २०२६ रोजी वर्क ऑर्डर जारी करण्यात आली असून, संबंधित ठेकेदाराला हे काम तीन महिन्यांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कार्यादेशात हे काम **Rehabilitation and Repairing Work of Minor Bridge** असे नमूद करण्यात आले आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पुलाची सध्याची स्थिती पाहता एवढ्या मोठ्या निधीची आवश्यकता नसल्याचा दावा केला जात आहे. किरकोळ दुरुस्तीच्या कामासाठी इतका खर्च मंजूर झाल्याने अंदाजपत्रक, तांत्रिक मंजुरी आणि निविदा प्रक्रियेबाबत संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात पुलाचे स्वतंत्र तांत्रिक ऑडिट करून प्रत्यक्ष आवश्यक खर्च आणि मंजूर खर्चाची तुलना करावी, तसेच निविदा प्रक्रियेत कोणतीही अनियमितता किंवा संगनमत झाले आहे का, याची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) किंवा अन्य सक्षम यंत्रणेमार्फत करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. जर दुरुस्तीच्या नावाखाली शासनाच्या निधीचा गैरवापर झाल्याचे चौकशीत निष्पन्न झाले, तर संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही जोर धरत आहे.

दरम्यान, या प्रकरणावर सार्वजनिक बांधकाम विभागाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

# विमान सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह? हितसंबंधांच्या संघर्षावरून डीजीसीएला केंद्राची खरमरीत तंबी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारतातील विमान सुरक्षेची देखरेख करणाऱ्या महानिदेशालय नागरी उड्डाण (DGCA) या सर्वोच्च नियामक संस्थेवरच आता पारदर्शकतेचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. केंद्रीय नागरी उड्डाण मंत्रालयाने हितसंबंधांच्या संघर्षाच्या (Conflict of Interest) प्रकरणांमध्ये योग्य कारवाई करण्यात अपयशी ठरल्याबद्दल DGCA ला अधिकृतपणे फटकारल्याचे समोर आले आहे.




सरकारी कागदपत्रांनुसार, DGCA मधील अनेक अधिकाऱ्यांचे नातेवाईक विमान कंपन्यांमध्ये कार्यरत असून, अशा परिस्थितीत संबंधित अधिकाऱ्यांनी नियामक निर्णय प्रक्रियेतून स्वतःला दूर ठेवणे अपेक्षित होते. मात्र, काही प्रकरणांमध्ये तसे झाले नसल्याचा मंत्रालयाचा निष्कर्ष आहे. एका प्रकरणात, एअर इंडियाशी संबंधित निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्यांच्या जवळच्या नातेवाईकाची त्याच कंपनीत नियुक्ती झाल्याचाही उल्लेख करण्यात आला आहे.

माहितीनुसार, जानेवारी २०२६ पर्यंत DGCA मधील ५१ अधिकाऱ्यांनी विमान वाहतूक क्षेत्रात कार्यरत असलेल्या ५९ नातेवाईकांची माहिती जाहीर केली होती, जी मागील वर्षाच्या तुलनेत वाढलेली आहे. या पार्श्वभूमीवर मंत्रालयाने DGCA कडून हितसंबंधांच्या संघर्षासंबंधी अधिक कठोर आणि पारदर्शक यंत्रणा राबविण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

ही बाब अशा वेळी समोर आली आहे, जेव्हा भारतातील नागरी विमान वाहतूक क्षेत्र वेगाने विस्तारत आहे. वाढती प्रवासी संख्या, सुरक्षा मानकांचे पालन, मनुष्यबळाची कमतरता आणि नियामक संस्थेवरील विश्वास या सर्व मुद्द्यांमुळे DGCA ची भूमिका अधिक महत्त्वाची बनली आहे. याशिवाय, DGCA च्या एका अधिकाऱ्याविरुद्ध सुरू असलेल्या कथित लाचखोरीच्या चौकशीमुळे आणि आगामी अमेरिकन ऋअअ सुरक्षा ऑडिटच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणाचे महत्त्व अधिक वाढले आहे. या घडामोडीनंतर तज्ज्ञांकडून एक मूलभूत प्रश्न उपस्थित केला जात आहेदेशातील विमान सुरक्षा आणि नियमनाची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्यांच्याच निर्णय प्रक्रियेवर हितसंबंधांचा संशय निर्माण होत असेल, तर प्रवाशांचा विश्वास कसा टिकवला जाणार? सरकारचे म्हणणे आहे की नियामक संस्थांमध्ये उत्तरदायित्व आणि पारदर्शकता सुनिश्चित करणे हीच सुरक्षित विमान वाहतुकीची पहिली अट आहे.

## सेन्सेक्स-निफ्टी दोन आठवड्यांतील सर्वात मोठ्या घसरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई । प्रतिनिधी

मध्यपूर्वेतील वाढत्या संघर्षामुळे जागतिक बाजारपेठांमध्ये निर्माण झालेल्या अस्थिरतेचा फटका भारतीय शेअर बाजारालाही बसला आहे. बुधवारी भारतीय शेअर बाजारातील दोन्ही प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टी यांनी गेल्या दोन आठवड्यांतील सर्वात मोठी घसरण नोंदवली. सलग तिसऱ्या दिवशी बाजार लाल निशाणावर बंद झाल्याने गुंतवणूकदारांची चिंता अधिक वाढली आहे.

व्यवहाराच्या अखेरीस निफ्टी ५० सुमारे ०.७९ टक्क्यांनी घसरून २३,९९६.२५ वर बंद झाला, तर बीएसई सेन्सेक्स ०.९२ टक्क्यांनी घसरून ७६,७५५.०५ वर स्थिरावला. बाजारातील ही घसरण प्रामुख्याने मध्यपूर्वेतील संघर्ष तीव्र होण्याच्या भीतीमुळे आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे झाल्याचे विश्लेषकांचे मत आहे.

ब्रेंट क्रूडचा भाव प्रति बॅरल ९५ डॉलरच्या पुढे गेल्याने भारतासारख्या कच्च्या तेलाच्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशांसाठी धोक्याची घंटा वाजली आहे. तेल महागल्यास पेट्रोल, डिझेल, एलपीजी, वाहतूक आणि उत्पादन खर्च वाढण्याची शक्यता असून त्याचा थेट परिणाम महागाईवर होऊ शकतो. त्यामुळे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या व्याजदर धोरणावरही दबाव वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## ‘नीट’ रद्द करा, विद्यार्थ्यांचा आवाज दाबू नका! विजय यांचा केंद्रावर हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

चेन्नई । प्रतिनिधी

तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि तमिळगा वेत्री कळघम (TVK) चे अध्यक्ष सी. जोसेफ विजय यांनी राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (NEET) तात्काळ रद्द करण्याची मागणी पुन्हा एकदा ठामपणे मांडत केंद्र सरकारवर तीव्र टीका केली आहे. शिक्षणव्यवस्थेवर वारंवार होत असलेल्या पेपरफुटीच्या घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले असून, अशा परिस्थितीत केवळ आश्वासने देण्याऐवजी धोरणात्मक बदल आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले.

विजय यांनी सोशल मीडियावरील पोस्टद्वारे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि इतर विरोधी नेत्यांना नवी दिल्लीत पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेर आंदोलन करताना ताब्यात घेतल्याच्या घटनेचाही तीव्र निषेध केला. पेपरफुटी आणि शिक्षण सुधारणांच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या नेत्यांना रोखणे हे लोकशाही मूल्यांवर आघात असल्याचा आरोप त्यांनी केला. विजय यांच्या मते, देशभरात वारंवार होणाऱ्या परीक्षा घोटाळ्यांमुळे विद्यार्थी आणि पालकांचा विश्वास डळमळीत झाला आहे. अशा वेळी सरकारने आंदोलन करणाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी शिक्षणव्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. त्यांनी छएएढ परीक्षा सामाजिक आणि शैक्षणिक विषमता वाढवणारी असल्याचा आरोप करत ती पूर्णपणे रद्द करण्याची मागणी पुन्हा अधोरेखित केली.

दरम्यान, विरोधकांचा आरोप आहे की पेपरफुटीच्या गंभीर प्रश्नावर उत्तर देण्याऐवजी केंद्र सरकार आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करत आहे. दुसरीकडे, केंद्र सरकारने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ती पावले उचलल्याचे सांगितले आहे.

# ‘नीट’ आंदोलन ‘हायजॅक’? एबीव्हीपीचा गंभीर आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी

NEET-UG आणि इतर स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी व शिक्षणव्यवस्थेतील त्रुटींविरोधात जंतर-मंतर येथे झालेल्या आंदोलनावर अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (ABVP) ने महत्त्वाची भूमिका मांडली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी (RSS) संलग्न असलेल्या या विद्यार्थी संघटनेने आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसाचाराचा निषेध करत, विद्यार्थ्यांचे मूळ आंदोलन राजकीय हितसंबंध आणि समाजकंटकांनी हायजॅक केले असा गंभीर आरोप केला आहे.

ABVP ने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित असलेल्या परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकता आणि विश्वासार्हतेचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे या विषयावर केवळ राजकीय संघर्ष न होता, केंद्र सरकारने तातडीने उच्चस्तरीय समिती स्थापन करून स्पर्धा परीक्षांच्या संपूर्ण प्रक्रियेचा आढावा घ्यावा आणि आवश्यक सुधारणा कराव्यात.

विद्यार्थी संघटनेने आंदोलनादरम्यान झालेल्या धक्काबुक्की आणि हिंसाचारावरही नाराजी व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्या कोणत्याही राजकीय अजेंड्याच्या छायेत हरवू नयेत, असा इशारा देत ABVP ने संवाद, पारदर्शकता आणि संस्थात्मक सुधारणांच्या माध्यमातूनच या प्रश्नावर तोडगा काढण्याचे आवाहन केले आहे.

दरम्यान, विरोधी पक्ष केंद्र सरकारवर पेपरफुटीच्या वाढत्या घटनांबाबत निष्क्रियतेचा आरोप करत आहेत, तर आता वैचारिकदृष्ट्या सत्ताधारी विचारसरणीशी जवळीक असलेल्या अइतझ कडूनही परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर प्रश्न उपस्थित होत असल्याने या प्रकरणाला नवे राजकीय आणि सामाजिक परिमाण मिळाले आहे.

## तृणमूल खासदार कल्याण बॅनर्जी संपूर्ण पावसाळी अधिवेशनासाठी निलंबित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी

लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनात राजकीय संघर्ष आणखी तीव्र झाला असून, तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांना उर्वरित संपूर्ण अधिवेशनासाठी निलंबित करण्यात आले आहे. महिला सदस्यांविषयी आक्षेपार्ह भाषा वापरल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. संबंधित महिला सदस्य या नव्याने स्थापन झालेल्या नॅशनल सिटिझन पार्टी ऑफ इंडिया (छउझख) या पक्षाशी संबंधित असल्याचे सांगितले जात आहे.

या कारवाईनंतर विरोधी पक्षांनी तीव्र आक्षेप घेत लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतली. काँग्रेसचे के. सी. वेणुगोपाल, समाजवादी पक्षाचे धर्मेंद्र यादव, तृणमूलच्या महुआ मोईत्रा, कीर्ती आझाद, सजदा अहमद, प्रतिमा मंडल यांच्यासह अनेक खासदारांनी निलंबन मागे घेण्याची मागणी केली. विरोधकांचा दावा आहे की



ज्या वादाच्या आधारे कारवाई करण्यात आली,

तो प्रसंग सभागृह तहकूब झाल्यानंतर घडला होता. त्यामुळे लोकसभा नियमांनुसार अशा घटनेवर सभागृहातील शिस्तभंगाची कारवाई लागू होत नाही, असा त्यांचा युक्तिवाद आहे. त्यांच्या मते, हा निर्णय संसदीय परंपरा आणि प्रक्रियेबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारा आहे.

दुसरीकडे, सत्ताधारी पक्षाचे म्हणणे आहे की संसद सदस्यांचे वर्तन हे संसदेच्या प्रतिष्ठेशी जोडलेले असते. महिला सदस्यांविषयी कोणतीही कथित अवमानकारक भाषा सहन केली जाणार नाही आणि अशा प्रकरणांत कठोर कारवाई करणे आवश्यक आहे.

## सरकारी कर्मचाऱ्यांसाठी केंद्राकडून महागाई भत्त्यात वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधीवाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांमध्ये (CPSEs) कार्यरत अधिकारी आणि बिगर-युनियन पर्यवेक्षक कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. सार्वजनिक उपक्रम विभागाने (Department of Public Enterprises - DPE) औद्योगिक महागाई भत्ता (Industrial Dearness Allowance - IDA) वाढवण्याची घोषणा केली असून, नव्या दरांमुळे लाखो कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनात वाढ होणार आहे. केंद्रीय कर्मचाऱ्यांना जुलै-डिसेंबर सहामाहीसाठी महागाई भत्त्याच्या (DA) वाढीची प्रतीक्षा असतानाच, सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी ही घोषणा करण्यात आली आहे. ही वाढ विविध वेतनश्रेणींनुसार लागू होणार असून, १९८७, १९९७, २००७ आणि २०१७ च्या वेतनश्रेणीतील अधिकाऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे.

# राज्यभरात दिवंगत अजितदादा पवार यांना अभिवादन; राजभवन, विधानभवन आणि मंत्रालयात पुष्पांजली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी (दि. २२) राज्यभर विविध शासकीय कार्यालयांमध्ये अभिवादन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. राजभवन, विधानभवन आणि मंत्रालय येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी भावपूर्ण आदरांजली वाहिली.

राजभवनातील लोकभवन येथे आयोजित कार्यक्रमात राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण केली. यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सहसचिव एस. राममूर्ती, परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे तसेच राजभवनातील अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस अधिकारी उपस्थित होते.

विधानभवनात आयोजित कार्यक्रमात विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर आणि सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी आमदार शिवाजीराव गर्जे, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे





सचिव-१ जितेंद्र भोळे, सचिव-४ शिवदर्शन साळ्वे, सहसचिव राजेश तारवी, उपसचिव विजय कोमटवार, जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मंत्रालयातही जयंतीनिमित्त विशेष अभिवादन कार्यक्रम पार पडला. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे आणि सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे, आमदार जयंत आसगावकर, आमदार शिवाजीराव गर्जे, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख तसेच मंत्रालयातील विविध विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. राज्याच्या विविध भागांतील शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि विविध राजकीय पक्षांच्या वतीनेही दिवंगत अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी त्यांच्या सार्वजनिक जीवनातील योगदान, विकासाभिमुख नेतृत्व आणि प्रशासनातील कार्यक्षम शैलीचा उल्लेख करून त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

# दुसरे लग्न अवैध असेल तर ‘पती’ म्हणता येणार नाही? अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयाने हुंडाबळी आणि क्रूरतेच्या कायद्यावर नवी चर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

प्रयागराज । प्रतिनिधी

अलाहाबाद उच्च न्यायालयाने भारतीय न्याय संहिता (BNS) मधील कलम ८० (हुंडाबळी) आणि कलम ८५ (पती किंवा त्याच्या नातेवाईकांकडून क्रूरता) यांच्या संदर्भात महत्त्वपूर्ण कायदेशीर स्पष्टीकरण देत म्हटले आहे की, ज्या पुरुषाचे दुसरे लग्न कायद्याने अवैध (Void Marriage) ठरते, त्याला सर्वसाधारणपणे या कलमांखाली पती मानता येणार नाही. या निरीक्षणामुळे वैवाहिक गुन्ह्यांशी संबंधित कायद्याच्या व्याख्येबाबत देशभरात नवी चर्चा सुरू होण्याची शक्यता आहे.

न्यायमूर्ती अरुण कुमार सिंह देशवाल यांच्या खंडपीठाने हा निर्णय एका जामीन अर्जावरील सुनावणीदरम्यान दिला. संबंधित आरोपीवर त्याच्या कथित दुसऱ्या पत्नीच्या आत्महत्येनंतर इछड कलम ८०(२), कलम ८५ तसेच हुंडा प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३ आणि ४ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते.

आरोपीचा युक्तिवाद असा होता की, त्याचे पहिले लग्न कायदेशीररीत्या अस्तित्वात असतानाच दुसरे लग्न झाले. त्यामुळे दुसरे लग्न हिंदू विवाह कायद्यानुसार शून्य (Void) असल्याने, त्या महिलेच्या संदर्भात त्याला कायदेशीर पती म्हणता येणार नाही. न्यायालयाने या मुद्द्याचा सखोल विचार करत असे नमूद केले की, जिथे विवाहच कायदेशीरदृष्ट्या अस्तित्वात नाही, तिथे त्या व्यक्तीला सर्वसाधारणपणे पती म्हणून मान्यता देणे कायद्याच्या भाषेशी सुसंगत ठरत नाही.

मात्र, न्यायालयाने या निर्णयात काही महत्त्वाचे अपवादही स्पष्ट केले आहेत. जर पहिल्या विवाहाची वैधता स्वतःच वादग्रस्त असेल, किंवा पुरुषाने पहिले लग्न लपवून महिलेची फसवणूक करून विवाह केला असेल, अथवा मुस्लिम वैयक्तिक कायद्यानुसार एकापेक्षा अधिक विवाह कायदेशीररीत्या मान्य असतील, तर अशा परिस्थितीत या निर्णयाचा सरसकट आधार घेता येणार नाही. प्रत्येक प्रकरणातील वस्तुस्थिती आणि लागू असलेला कायदा स्वतंत्रपणे तपासला जाईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

या निर्णयानंतर कायदेतज्ज्ञांमध्ये दोन भिन्न मतप्रवाह दिसून येत आहेत. एका बाजूला काहींचे मत आहे की न्यायालयाने केवळ कायद्याच्या विद्यमान शब्दरचनेचा अर्थ स्पष्ट केला असून, फौजदारी कायद्यातील तरतुदींचा विस्तार न्यायालयाऐवजी विधिमंडळाने करणे अपेक्षित आहे. दुसरीकडे, महिला हक्कांसाठी काम करणाऱ्या काही कार्यकर्त्यांच्या मते, अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये फसवणूक झालेल्या महिलांना न्याय मिळवताना अतिरिक्त कायदेशीर अडचणी निर्माण होऊ शकतात.

विशेष म्हणजे, हा निर्णय हुंडाबळी किंवा कौटुंबिक अत्याचाराला मान्यता देणारा नाही. न्यायालयाने केवळ इछड मधील विशिष्ट कलमांतील पती या शब्दाचा अर्थ स्पष्ट केला आहे. जर इतर कोणते गुन्हे, जसे की फसवणूक, मारहाण, आत्महत्येस प्रवृत्त करणे किंवा इतर दंडनीय कृत्ये सिद्ध होत असतील, तर संबंधित कायद्यांनुसार कारवाई होऊ शकते.

या निर्णयामुळे एक व्यापक प्रश्न पुन्हा समोर आला आहे विवाहाच्या वैधतेच्या तांत्रिक प्रश्नामुळे एखाद्या महिलेच्या संरक्षणावर परिणाम होऊ नये, यासाठी कायद्यात अधिक स्पष्ट आणि व्यापक सुधारणा करण्याची गरज आहे का? बदलत्या सामाजिक वास्तवाच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकरणांमध्ये महिलांचे हक्क, न्याय आणि कायदेशीर संरक्षण यांचा समतोल राखणे ही विधिमंडळ आणि न्यायव्यवस्था या दोघांसमोरील मोठी जबाबदारी राहणार आहे.

**टीप:** हा निर्णय विशिष्ट प्रकरणातील कायदेशीर प्रश्नावर आधारित आहे. प्रत्येक प्रकरणातील तथ्ये, संबंधित वैयक्तिक कायदे आणि पुरावे वेगळे असू शकतात. त्यामुळे हा निर्णय सर्व प्रकरणांवर एकसारखा लागू होतो, असा अर्थ काढता येणार नाही.